पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८.

**मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - ०८

**सभावृत्तांत**

**दिनांक - २३/०७/२०२१** **वेळ - दुपारी ३.०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **२३/०७/२०२१** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील तिस-या मजल्यावरील मा.सभापती, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती यांचे दालनात मा.उपसचिव महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र.कोरोना/२०२०/प्र.क्र.७६/नवि-१४ दि.०३ जुलै २०२० व २८ जून २०२१ अन्वये ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) आयोजित करणेत आली होती. सदर सभेत खालील प्रमाणे काही सन्मा.सदस्य मा.सभापती यांचे दालनात तर काही सन्मा.सदस्य ऑनलाईन पध्दतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग द्वारे) उपस्थित होते.

**१. मा. उत्तम प्रकाश केंदळे - सभापती**
२. मा. तुषार रघुनाथ हिंगे
३. मा. शैलेश उर्फ शैलेंद्र प्रकाश मोरे
४. मा. अपर्णा निलेश डोके
५. मा. भालेकर प्रविण महादेव
६. मा. दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.खोत - उप आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पानसरे- क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------------

उपस्थित सन्मा.सदस्याच्या संमतीने खालील ऐनवेळेचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेण्यात आले.

विषय क्र.२) प्रभाग क्र.१३, जेष्ठ नागरिक संघ यमुनानगर यांकरिता कॅरम बोर्ड व खुर्च्या खरेदी करणेस प्रशासकीय मान्यता घेणेबाबत - मा.प्रविण भालेकर, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) प्रभाग क्र.१३, यमुनानगर जलतरण तलाव परिसरात नव्याने टेबल टेनिस सेंटर सुरू करणेस, त्याकामी लागणारे टेबल टेनिसचे टेबल, रॅकेट, बॉल खरेदी करणेस प्रशासकीय मान्यता घेणेबाबत - मा.प्रविण भालेकर, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) प्रभाग क्र.१३, यमुनानगर जलतरण तलाव परिसरात नव्याने सुरू करावयाचे टेबल टेनिस सेंटर, पिंपरी चिंचवड टेबल टेनिस असोसिएशन, पिंपरी कॉलनी पुणे४११०१७ या संस्थेस नाममात्र भाडे दराने, ११ महिने करिता भाडे कराराने चालविण्यास देणेस प्रशासकीय मान्यता घेणेबाबत - मा.प्रविण भालेकर, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) प्रभाग क्र.२६, सावित्रीबाई फुले उद्यान विशालनगर, पिंपळे निलख येथील कै.वामनराव जगताप विरंगुळा केंद्र येथे नव्याने संगीत वर्ग सुरु करणेस प्रशासकीय मान्यता घेणेबाबत - मा.प्रविण भालेकर, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) प्रभाग क्र.२६, सावित्रीबाई फुले उद्यान विशालनगर, पिंपळे निलख येथील कै.वामनराव जगताप विरंगुळा केंद्र येथे नव्याने सुरू करावयाच्या संगीत वर्गाकरिता जाहिरात प्रसिध्द करुन मानधनावर संगीत शिक्षक नियुक्त करणेस प्रशासकीय मान्यता घेणेबाबत - मा.प्रविण भालेकर, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) स्काय चाईल्ड फौडेशन या संस्थेला से.क्र.२६ प्राधिकरण निगडी येथील एरोबिक सेंटर जिम्नॅशिअम हॉल देणेबाबत - मा.प्रविण भालेकर, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) प्रभाग क्र.११ येथील म्हेत्रेवस्ती ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले प्राथमिक शाळेतील व्यायामशाळा म्हेत्रेवस्ती चिखली हि वीर अभिमन्य फ्रेंड सर्कल साने चौक चिखली या संस्थेस चालविण्यास देणे बाबत - मा.प्रविण भालेकर, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.९) प्रभाग क्र.२६ वाकड पिंपळे निलख येथे नव्याने कार्यान्वीत झालेली व्यायामशाळा कावेरीनगर हि कावेरीनगर युवक मित्र मंडळ या संस्थेस चालविण्यास देणे बाबत - मा.प्रविण भालेकर, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) प्रभाग क्र.६ सदगुरुनगर भोसरी येथील मनपाची व्यायमशाळा हि श्री ज्योतिबा स्वयरोजगार सेवा सहकारी संस्था रधाकृष्णनगी स.न. १९८ जुन्या पोस्ट ऑफीस समोर चक्रपाणी रोड भोसरी पुणे ३९ या संस्थेस चालविण्यास देणे बाबत - मा.प्रविण भालेकर, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.११) प्रभाग क्र.१३, अहिल्याबाई होळकर उद्यान, यमुनानगर येथील हॉल मध्ये नव्याने रायफल शुटींग प्रशिक्षण केंद्र करणेस व त्या अनुषंगाने रायफल शुटींग साहित्य खरेदी करणेस प्रशासकीय मान्यता घेणेबाबत - मा.प्रविण भालेकर, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१२) प्रभाग क्र.१३, यमुनानगर जलतरण तलाव येथील कै.बाळासाहेब ठाकरे सभागृह, हॉल मध्ये नव्याने संगीत वर्ग सुरू करणेस व त्या अनुषंगाने संगीत वाद्ये, संगीत साहित्य खरेदी करणेस प्रशासकीय मान्यता घेणेबाबत - मा.प्रविण भालेकर, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१३) प्रभाग क्र.१३, यमुनानगर जलतरण तलाव येथील कै.बाळासाहेब ठाकरे सभागृह, हॉल मध्ये नव्याने सुरु करावयाच्या संगीत वर्गाकरिता जाहिरात प्रसिध्द करुन मानधनावर संगीत शिक्षक नियुक्त करणेस प्रशासकीय मान्यता घेणेबाबत - मा.प्रविण भालेकर, मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

----------

अ) दिनांक १२/०३/२०२१ व ०९/०७/२०२१ रोजी झालेल्या ( कार्यपत्रिका क्रमांक **०७** ) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----------

ठराव क्रमांक - २९ विषय क्रमांक - ०१

दिनांक - २३/०७/२०२१ विभाग- क्रिडा

सुचक - मा.प्रविण भालेकर अनुमोदक - मा.शैलेश मोरे

संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रिडा/७/कावि/३२३/२०२१, दि.०२/०७/२०२१.

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे -

ग्रामसेवक, ग्रामपंचायत, तुळापुर यांना श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान दिन (फाल्गुन अमावास्या) समाधी ठिकाणी, तुळापुर येथे मंडप व्यवस्था, लाईट व्यवस्था, पिण्याचे पाणी, हारफुले इ.करिता अनुदान, आर्थिक सहाय्य अदा करणेकामी, " ग्रामपंचायत, तुळापुर यांना श्री छत्रपती संभाजी महाराज यांचे बलिदान दिन (फाल्गुन अमावास्या) कार्यक्रमासाठी द्यावयाचे अनुदान" असे नव्याने लेखाशिर्ष करणेस व या लेखाशिर्षावर सन २०२१-२२ पासून दरवर्षी र.रु.३,००,०००/- इतकी तरतूद करणे या करिता उपयोगिता प्रमाणपत्र/विनियोग दाखला, खर्चाच्या पावत्या सादर करणे व दरवर्षी मान्यता घेऊनच कार्यवाही करणेकामी मा.स्थायी समिती मार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेण्यात आले.**

ठराव क्रमांक - ३० विषय क्रमांक - ०२

दिनांक - २३/०७/२०२१

सुचक - मा.प्रविण भालेकर अनुमोदक - मा.शैलेश मोरे

संदर्भ - मा.प्रविण भालेकर व मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रभाग क्र.१३, जेष्ठ नागरिक संघ यमुनानगर यांना कॅरम बोर्ड व खुर्च्यांची आवश्यकता असून त्यांनी मा.सभापती, मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती यांचेकडे वेळोवेळी मागणी केली आहे. तरी प्रभाग क्र.१३, जेष्ठ नागरिक संघ यमुनानगर यांकरिता ६ कॅरम बोर्ड व २५ खुर्च्या खरेदी करणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३१ विषय क्रमांक - ०३

दिनांक - २३/०७/२०२१

सुचक - मा.प्रविण भालेकर अनुमोदक - मा.शैलेश मोरे

संदर्भ - मा.प्रविण भालेकर व मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रभाग क्र.१३ यमुनानगर जलतरण तलाव परिसरात नव्याने टेबल टेनिस सेंटर सुरु करण्याकरिता जागा उपलब्ध आहे. सदर ठिकाणी नव्याने टेबल टेनिस सेंटर सुरु केल्यास क्रीडा प्रेमी, नागरिक यांना त्याचा लाभ घेता येईल तरी प्रभाग क्र.१३ यमुना नगर जलतरण तलाव परिसरात नव्याने टेबल टेनिस सेंटर सुरु करणेस त्याकामी लागणारे जागा उपलब्धतेनुसार आवश्यकते प्रमाणे टेबल टेनिसचे टेबल, रॅकेट, टेबल टेनिस बॉल खरेदी करणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३२ विषय क्रमांक - ०४

दिनांक - २३/०७/२०२१

सुचक - मा.प्रविण भालेकर अनुमोदक - मा.शैलेश मोरे

संदर्भ - मा.प्रविण भालेकर व मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रभाग क्र.१३, यमुनानगर जलतरण तलाव परिसरात नव्याने टेबल टेनिस सेंटर सुरु करणेकरिता जागा उपलब्ध आहे, सदर ठिकाणी नव्याने टेबल टेनिस सेंटर सुरु करण्याचे नियोजन आहे. यमुनानगर जलतरण तलाव परिसरात नव्याने सुरु करावयाचे टेबल टेनिस सेंटर, हे श्री चंदर थवानी, सचिव, पिंपरी चिंचवड टेबल टेनिस असोसिएशन, सर्व्हे नं.२२४/५ ए /१ सुयोग रेसिडेन्सी, बी विंग फ्लॅट नं.१०, पिंपरी कॉलनी, पुणे ४११०१८ या संस्थेस नाममात्र भाडे दराने, ११ महिने करिता, भाडे कराराने चालविण्यास देणेकामी त्यांनी मा.सभापती,मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती यांचेकडे मागणी केली आहे. तरी प्रभाग क्र.१३, यमुनानगर जलतरण तलाव परिसरात नव्याने सुरु करावयाचे टेबल टेनिस सेंटर, हे श्री.चंदर थवानी, सचिव, पिंपरी चिंचवड टेबल टेनिस असोसिएशन, सर्व्हे नं.२२४/५ ए /१ सुयोग रेसिडेन्सी, बी विंग फ्लॅट नं.१०, पिंपरी कॉलनी, पुणे ४११०१८ या संस्थेस नाममात्र भाडे दराने, ११ महिने करिता, भाडे कराराने चालविण्यास देणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३३ विषय क्रमांक - ०५

दिनांक - २३/०७/२०२१

सुचक - मा.प्रविण भालेकर अनुमोदक - मा.शैलेश मोरे

संदर्भ - मा.प्रविण भालेकर व मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रभाग क्र.२६, सावित्रीबाई फुले उद्यान विशालनगर, पिंपळे निलख येथील कै.वामनराव जगताप विरंगुळा केंद्र येथे जागा उपलब्ध आहे. सदर विरंगुळा केंद्र मध्ये नव्याने संगीत वर्ग सुरु केल्यास, या परिसरातील विद्यार्थी, संगीत प्रेमी, नागरिक यांना त्याचा लाभ घेता येईल. तरी प्रभाग क्र.२६, सावित्रीबाई फुले उद्यान विशालनगर, पिंपळे निलख येथील कै.वामनराव जगताप विरंगुळा केंद्र येथे नव्याने संगीत वर्ग सुरु करणेस, व त्या अनुषंगाने संगीत वाद्ये, संगीत साहित्य खरेदी करणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३४ विषय क्रमांक - ०६

दिनांक - २३/०७/२०२१

सुचक - मा.प्रविण भालेकर अनुमोदक - मा.शैलेश मोरे

संदर्भ - मा.प्रविण भालेकर व मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रभाग क्र.२६, सावित्रीबाई फुले उद्यान विशालनगर, पिंपळे निलख येथील कै.वामनराव जगताप विरंगुळा केंद्र येथे नव्याने संगीत वर्ग सुरु करण्याचे नियोजन आहे. तरी प्रभाग क्र.२६, सावित्रीबाई फुले उद्यान विशालनगर, पिंपळे निलख येथील कै.वामनराव जगताप विरंगुळा केंद्र येथे नव्याने सुरु करावयाच्या संगीत वर्गाकरिता जाहिरात प्रसिध्द करून मानधनावर संगीत शिक्षक नियुक्त करणेस प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३५ विषय क्रमांक - ०७

दिनांक - २३/०७/२०२१

सुचक - मा.प्रविण भालेकर अनुमोदक - मा.शैलेश मोरे

संदर्भ - मा.प्रविण भालेकर व मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

कु.स्नेहा कासले या अर्बन हेल्थ या नावाने जिम चालवित आहेत. त्यांनी महिलांकरिता झुंबा क्लासेस व अरोबिक साठी से.क्र.२६ येथील अरोबिक सेंटर, जिम्नॅशियम हॉलची मागणी केली होती. सदर मागणीचा विचार करुन महानगरपालिकेने क्रिडा समितीत ठराव क्र.८९ विषय क्र.१० दि.१३/०३/२०२० रोजी त्यांना से.क्र.२६ येथील अरोबिक सेंटर, जिम्नॅशियम हॉल देण्याचा विषय झाला होता. पण कु.स्नेहा कासले यांनी महानगरपालिकेचा भाडे करार केलेला नाही, दुरध्वनी, मेलवर तसेच तोंडी कळवूनही काहीच प्रतिसाद नसल्याने म.न.पा.चे नुकसान होत आहे. त्यामुळे स्काय चाईल्ड फौंडेशन ही संस्था २०१६ पासून दिव्यांग आणि विशेष मुलांसाठी कृती आणि रिहॅबिलिटेशन सेंटर चालवित आहे. तरी सदर संस्थेत दिव्यांग मुलांना विविध उपक्रम थेरिपिद्वारे मुख्य प्रवाहात आणण्याचे प्रयत्न केले जातात. तरी सदरचा हॉल स्काय चाईल्ड फौंडेशन या संस्थेला देण्यात यावा. सदरची स्काय चाईल्ड फौंडेशन ही संस्था महानगरपालिकेने ठरविलेल्या भाडे दरात हॉल भाड्याने घेण्यास तयार आहे. तरी सदर संस्थेस हॉल देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६ विषय क्रमांक - ०८

दिनांक - २३/०७/२०२१

सुचक - मा.प्रविण भालेकर अनुमोदक - मा.शैलेश मोरे

संदर्भ - मा.प्रविण भालेकर व मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्रमांक ११ येथील म्हेत्रेवस्ती ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले प्राथमिक शाळेतील व्यायामशाळा म्हेत्रेवस्ती चिखली हि वीर अभिमन्यू फ्रेंड सर्कल साने चौक चिखली या संस्थेस दरमहा रक्कम रूपये २०००/- म.न.पा कडून सेवाशुल्क देऊन ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३७ विषय क्रमांक - ०९

दिनांक - २३/०७/२०२१

सुचक - मा.प्रविण भालेकर अनुमोदक - मा.शैलेश मोरे

संदर्भ - मा.प्रविण भालेकर व मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र २६ वाकड पिंपळे निलख येथे नव्याने कार्यान्वीत झालेली व्यायामशाळा कावेरीनगर ही कावेरीनगर युवक मित्र मंडळ या संस्थेस ११ महिने कराराने सेवाशुल्क र.रू. २०००/- म.न.पा कडून देवून सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३८ विषय क्रमांक - १०

दिनांक - २३/०७/२०२१

सुचक - मा.प्रविण भालेकर अनुमोदक - मा.शैलेश मोरे

संदर्भ - मा.प्रविण भालेकर व मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.६ सदगुरूनगर भोसरी येथील मनपाची व्यायामशाळा हि श्री.ज्योतिबा स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था राधाकृष्णनगर स.न.१९८ जुन्या पोस्ट ऑफीस समोर चक्रपाणी रोड, भोसरी, पुणे ३९ या संस्थेस ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर र.रू.२०००/- (अक्षरी दोन हजार फक्त) महापालिकेकडून देवून चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविण्यात यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३९ विषय क्रमांक - ११

दिनांक - २३/०७/२०२१

सुचक - मा.प्रविण भालेकर अनुमोदक - मा.शैलेश मोरे

संदर्भ - मा.प्रविण भालेकर व मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रभाग क्र.१३, अहिल्याबाई होळकर उद्यान, यमुनानगर येथे एक हॉल उपलब्ध आहे. सदर हॉल मध्ये नव्याने रायफल शुटींग प्रशिक्षण केंद्र सुरु केल्यास, या परिसरातील विद्यार्थी, क्रीडा प्रेमी, नागरिक यांना त्याचा लाभ घेता येईल. तरी प्रभाग क्र.१३, अहिल्याबाई होळकर उद्यान, यमुनानगर येथील हॉल मध्ये नव्याने रायफल शुटींग प्रशिक्षण केंद्र करणेस व त्या अनुषंगाने रायफल शुटींग साहित्य खरेदी करणेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४० विषय क्रमांक - १२

दिनांक - २३/०७/२०२१

सुचक - मा.प्रविण भालेकर अनुमोदक - मा.शैलेश मोरे

संदर्भ - मा.प्रविण भालेकर व मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रभाग क्र.१३, यमुनानगर जलतरण तलाव येथील कै.बाळासाहेब ठाकरे सभागृह हॉल मध्ये नव्याने संगीत वर्ग सुरु केल्यास, या परिसरातील विद्यार्थी, संगीत प्रेमी, नागरिक यांना त्याचा लाभ घेता येईल. तरी प्रभाग क्र.१३ यमुनानगर जलतरण तलाव येथील कै.बाळासाहेब ठाकरे सभागृह हॉल मध्ये नव्याने संगीत वर्ग सुरु करणेस व त्या अनुषंगाने संगीत वाद्ये, संगीत साहित्य खरेदी करणेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ४१ विषय क्रमांक - १३

दिनांक - २३/०७/२०२१

सुचक - मा.प्रविण भालेकर अनुमोदक - मा.शैलेश मोरे

संदर्भ - मा.प्रविण भालेकर व मा.शैलेश मोरे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, प्रभाग क्र.१३ यमुनानगर जलतरण तलाव येथील कै.बाळासाहेब ठाकरे सभागृह हॉल उपलब्ध आहे. सदर हॉल मध्ये नव्याने संगीत वर्ग सुरु करण्याचे नियोजन आहे. तरी प्रभाग क्र.१३ यमुनानगर जलतरण तलाव येथील कै.बाळासाहेब ठाकरे सभागृह हॉल मध्ये नव्याने सुरु करावयाच्या संगीत वर्गाकरिता जाहिरात प्रसिद्ध करून मानधनावर संगीत शिक्षक नियुक्त करणेस प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **उत्तम प्रकाश केंदळे** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/३६५/२०२१
दिनांक : २९/०७/२०२१



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.